ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434, Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख ३ ऑगस्ट, १९५५ | अंक ३१

## विविध माहिती

**उत्तर प्रदेशांतील प्राथमिक शाळा**—उत्तर प्रदेश सरकारनें राज्याच्या सर्वच्या सर्व १७ जिल्ह्यांत प्राथमिक शिक्षणाच्या शाळा काढण्याचे हुकूम सोडले आहेत. १९४७ सालीं राज्य-सरकारनें प्राथमिक शिक्षणाचा विस्तार करण्याची योजना आंखली होती. सदर योजनेप्रमाणें राज्यांत आतांपर्यंत १२,२७६, प्राथमिक शाळा उघडण्यांत आल्या आहेत.

**साखरेच्या सहकारी कारखान्यांना मदत**—मुंबई राज्यांत निघणाऱ्या १० सहकारी साखर कारखान्यांचें भांडवल विकत घेण्यास सुलभ व्हावें म्हणून भारतीय सरकारनें राज्य सरकारला १ कोटी रुपये कर्ज देण्याचें ठरविलें आहे. ह्या कामासाठीं ४० लाख रुपयांचें कर्ज पंजाब सरकारला देण्यांत येणार आहे. सहकारी स्वरूपाच्या व्यापारी संस्थांना मदत देण्याच्या सरकारी धोरणाचा हा एक भाग आहे.

**हिंदी भाषांचा इतिहास**— भारतीय सरकारनें स्थापन केलेल्या साहित्य ॲकॅडमीनें कांहीं महत्त्वाच्या भारतीय भाषांचा व त्यामधील वाङ्मयाचा इतिहास प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे. ग्रंथ हिंदी व इंग्रजी भाषांतून प्रसिद्ध करण्यांत येईल. मराठी भाषा व वाङ्मय ह्यांच्या इतिहासाचें काम श्री. कुसुमावती देशपांडे ह्यांच्याकडे सोपविण्यांत आलें आहे.

**मद्रास-रंगून सागरी प्रवास**—भारतीय सरकारनें सूचना केल्यावरून शिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीनें मद्रास ते रंगून ह्या मार्गावरील प्रवासी वहातूक पुन्हां चालू करण्याचें ठरविलें आहे. ह्या मार्गावर प्रवास करणारी 'जलगोपाल' नांवाची कंपनीची बोट जुनी व धोकादायक झाल्यामुळें वहातूक बंद करण्यांत आली होती.

**इराणच्या पार्लमेंटचें आमंत्रण**—इराणमधील राज्यघटना तयार केल्याचा ५० वा दिन लवकरच साजरा करण्यांत येणार आहे. ह्या प्रसंगीं हजर राहण्यासाठीं हिंदी लोकसभेंतील सभासदांचें प्रतिनिधीमंडळ पाठविण्यांत यावें, अशी विनंती इराणच्या मजलिसच्या स्पीकरनें केली आहे. भारतीय प्रतिनिधी इराण सरकारचे पाहुणे म्हणून जाणार आहेत.

**भोपाळ राज्यांतील जंगलें**—भोपाळ राज्यांतील जंगलांचा विकास करून त्यांच्यापासून अधिक उत्पन्न काढण्याच्या योजना राज्य-सरकारनें आंखल्या आहेत. ग्रामोद्योगांना उपयोगी पडतील अशा प्रकारचीं झाडें लावणें आणि खाण्याचीं तेलें उत्पन्न करण्यास उपयोगी पडतील अशा वनस्पती लावणें ह्या दोन बाबींवर जोर देण्यांत येणार आहे. योजनेसाठीं ८० लाख रुपये खर्च येईल.

**हैदराबाद राज्यांतील हिऱ्यांच्या खाणी**—हैदराबाद व आंध्र राज्यांतून वहात जाणाऱ्या कृष्णेच्या पात्रांत हिरे सांपडणें कितपत शक्य आहे, तें पहाण्यासाठीं भारतीय सरकारचें भूस्तर खातें पहाणी करीत आहे. १७ व्या शतकांत नदीच्या पात्रांत कित्येक ठिकाणीं हिऱ्यांच्या खाणी होत्या. त्यावेळीं हा धंदा चांगला नांवारूपाला आला होता.

**तरुण स्त्री-चिटणिसांना आकर्षण्यासाठीं**—कॅनडांतील टोरोंटो शहरांत तरुण स्त्री-चिटणिसांची इतकी वाण भासत आहे कीं त्यांना आकृष्ट करण्यासाठीं व्यापारी कंपन्यांनीं मोठी स्पर्धा चालविली आहे. त्यांच्यासाठीं पेन्शनच्या खास योजना, अत्यंत आधुनिक पद्धतीचीं उपाहारगृहें व इतर अनेक सोयी-सवलती मुद्दाम देण्यांत येत आहेत.

**इंटरनॅशनल फिनॅन्स कॉर्पोरेशन**—भारतीय सरकारनें संकल्पित इंटरनॅशनल फिनॅन्स कॉर्पोरेशनचे सभासद होण्याचें ठरविलें आहे. कॉर्पोरेशनचें अधिकृत भांडवल १० कोटी डॉलर्सचें असेल आणि तें प्रत्येकीं १,००० डॉलर्सच्या १ लाख भागांत विभागण्यांत येईल. जागतिक बँकेचे सभासद असतील अशा राष्ट्रांनाच कॉर्पोरेशनचे भाग घेतां येतील.

**कच्छमध्यें विजेचीं केंद्रें**—कच्छमधील गांवांना विजेचा पुरवठा करण्यासाठीं मध्यवर्ती सरकारनें २४० लाख रुपये राखून ठेवले आहेत. कांडला बंदराला वीज पुरविण्यासाठीं ७,००० किलोवॅटचें एक केंद्र उभारण्यांत येत आहे. विजेच्या निर्मितीसाठीं डिझेल तेल आणि वाफेचें इंजिन ह्यांचा उपयोग करण्यांत येणार आहे.

**कच्छमधील जमीनदारी**—कच्छ राज्यांतील जमीनदारी रद्द करण्यासंबंधीं एक बिल भारतीय लोकसभेच्या येत्या अधिवेशनांत मांडण्यांत येणार आहे. मध्यवर्ती सरकारच्या गृह व कायदा खात्याचा एक एक अधिकारी राज्य-सरकारशीं ह्यासंबंधीं विचार-विनिमय करीत आहे. जमीनदारांना नुकसान-भरपाई देण्यासाठीं कच्छ सरकारनें ४०० लाख रुपये मंजूर केले आहेत.

**रशिअन सरकारचीं नवीं खातीं**—सोव्हिएट रशिआच्या सरकारनें मोटारींच्या कारखान्यासाठीं एक आणि शेतीचीं अवजारें तयार करणाऱ्या कारखान्यांसाठीं एक, अशीं दोन स्वतंत्र खातीं उघडण्याचें ठरविलें आहे.

**मराठी-कवितेचें भाषांतर**—मराठीमधील कांहीं निवडक कवितांचें इंग्रजी भाषांतर करण्यांत येणार आहे. मि. कार्ल शॅमिरो ह्या अमेरिकन कवीनें कवितांची निवड केली असून त्या 'पोएट्री' ह्या स्वसंपादित साहित्यिक मासिकांत ते प्रसिद्ध करणार आहेत.

## भारतीय रुपयाची परदेशांत चांगली पत

जगांतील ७४ प्रमुख देशांच्या चलनाविषयीं उद्बोधक व मनोरंजक माहिती देणारा पहिलाच ग्रंथ मि. फ्रॅन्झ पिक ह्या चलनविषयक अधिकारी अमेरिकन गृहस्थानें प्रसिद्ध केला आहे. ग्रंथाचीं पृष्ठें सुमारें ४०० असून त्यांत भारतीय चलनाविषयी माहिती दिलेली आहे. भारतीय रुपया हा आज जगांतील मजबूत चलनांपैकीं एक गणला जातो. १९५० सालापासून भारतीय रुपयाची खुल्या नाणें बाजारांतील पत वाढत गेलेली दिसून येते. भारतीय रुपयांच्या खऱ्या किंमतीच्या ९५ टक्के इतकी किंमत आज त्याला प्राप्त झालेली आहे. गेल्या दहा वर्षांत परदेशीय नाणें बाजारांत भारतीय चलनाचा काळा बाजार बऱ्याच मोठ्या प्रमाणावर चालत आहे. परंतु तरीसुद्धां त्याला सध्यांचें स्थैर्य प्राप्त झालें आहे हें लक्षांत घेण्यासारखें आहे. १९५० सालापासून काळ्या बाजारांतील व्यवहारांचें प्रमाण कमी झालें आहे. तथापि अजूनसुद्धां दरवर्षी सरासरी ५० कोटी डॉलर्स किंमतीच्या रुपयांचा काळा बाजार होतो. रुपयांचे इतर चलनांत रूपांतर करतां येईल त्यावेळीं आशिआंत भारतीय चलनाला आशिआंतील एका प्रमुख चलनाचें स्थान प्राप्त होईल असा विश्वास मि. पिक ह्यांनीं व्यक्त केला आहे. त्या मानानें पाकिस्तानी रुपयाची किंमत परदेशीय नाणें बाजारांत ३५ टक्के कमी धरली जाते. पाकिस्तानी रुपयांचाही काळाबाजार चालतो. अशा व्यवहारांत दरवर्षा सरासरी १५ कोटी पाकिस्तानी रुपयांची उलाढाल होते. पाकिस्तानांतील प्रत्येक व्यक्तीमागें सरासरी २३ रुपयांच्या चलनाचा हातबदल होतो. ही गोष्ट लक्षांत घेता पाकिस्तानांतील सामान्य माणसाचा अशा व्यवहारांत फारच थोडा हात असतो. बहुतेक व्यवहार व्यापारीच करतात, असें मत त्यांनीं व्यक्त केलें आहे.

## जपानमध्यें व्यापारी बोटींची बांधणी

जपान आपल्या दर्यावर्दी वहातुकीसाठी बोटी बांधण्याचा मोठा कार्यक्रम अंमलांत आणणार आहे. येत्या सहा वर्षांत १०,००,००० टन वजनाच्या नव्या व्यापारी बोटी दर्यावर्दी वहातुकीसाठीं बांधण्यांत येतील. नव्या बोटींत ५,३०,००० टन वजनाच्या मालवाहू बोटी आणि ३,००,००० टन वजनाच्या तेलाची वहातूक करणाऱ्या बोटी असतील. बोटी बांधणाऱ्या कंपन्यांकडून टेंडर्सच्या पद्धतीनें मात्र नव्या बोटी बांधण्यांत येणार नाहींत. असें केलें, तर निरनिराळ्या कंपन्यांत बेसुमार स्पर्धा होऊन उत्पादनाच्या खर्चापेक्षाहि कमी खर्चांत बोटी मिळतील. परंतु, त्यामुळें त्यांचा दर्जा खालावेल असें जपानी सरकारला वाटतें. म्हणून, सरकारमान्य अशा कारखान्यांकडून बोटी बांधवून घेण्यांत येणार आहेत. परदेशी व्यापारी वहातूक करणाऱ्या कांहीं बोटी जपानी कंपन्यांनीं उत्पादनाच्या खर्चापेक्षाहि कमी खर्चांत बांधून देण्याचे करार केले आहेत अशा तक्रारी सध्याच करण्यांत येत आहेत. उदाहरणार्थ, मिटसुबिशी बोट कंपनीनें १२,४०० टन वजनाच्या पांच मालवाहू बोटी प्रत्येकीं २४,००,००० डॉलर्स घेऊन बांधून देण्याचा करार केला होता. पण दुसऱ्या एका कंपनीनें प्रत्येकीं २३,००,००० डॉलर्स घेऊन बोटी बांधण्याचें कबूल केलें आहे. जपानी सरकारच्या वहातूक खात्यापर्यंत ह्या तक्रारी पोचल्या असून त्यांचा खात्यातर्फे विचार चालू आहे. तथापि, बोट बांधणीच्या नव्या कार्यक्रमासाठी बोटींच्या किंमती सरकार ठरवून देईल असें मात्र नाहीं. बोटींच्या नमुन्यांत सुधारणा करून उत्पादनाचा खर्च कमी करण्यासाठी एक संघटना स्थापण्यांत येईल.

## जाहिरातींवरील प्रचंड खर्च

अमेरिकेंतील फर्मसेनीं १९५४ मध्यें वृत्तपत्रांतील जाहिरातींवर ६० कोटी डॉलर्स (१ डॉलर = ४·८ रु.) एवढी प्रचंड रक्कम खर्च केली. ह्या खर्चांत सर्वांत मोठा वाटा मोटार कारखानदारांचा होता; त्यांनीं जाहिरातीवर १५ कोटी रुपये खर्च केले. त्याचें खालोखाल, खाद्यपेयांच्या कारखानदारांच्या खर्चाचा आकडा आला. जनरल मोटर्स कंपनी ही जाहिरातीवर इतर कोणत्याहि कंपनीपेक्षा अधिक खर्च करते; गेल्या वर्षी तिनें ४ कोटी डॉलर्सची जाहिरात केली. त्याचे खालोखाल पुढील कंपन्यांचा अनुक्रम लागतो:—

| कंपनी | जाहिरातीवरील खर्च ( लक्ष डॉलर ) |
|---|---|
| फोर्ड मोटार कंपनी | १७९ |
| क्रायसलर कॉर्पो. | ११८ |
| कोलगेट–पामॉलिव्ह कं. | १०९ |
| डिस्टिलर्स कॉर्पो. सॉग्रम्स | ९८ |
| जनरल फूड्स | ९३ |
| प्रॉक्टर अँड गॅंबल | ७२ |
| लिव्हर ब्रदर्स | ६८ |
| नॅशनल डिस्टिलर्स | ६७ |
| स्कीनले इंडस्ट्रीज | ६१ |

## बद्रिनाथच्या संरक्षणासाठी अलकनंदेला भिंत

अलकनंदेच्या उजव्या तीरावर एक भिंत बांधून, बद्रिनाथ गांवाचें पुरापासून संरक्षण करण्यांत येत आहे. ह्या भिंतीची उंची १८ फूट व लांबी २०० फूट होईल व तिला १,००,००० रु. खर्च येईल. अलकनंदेला उन्हाळ्यांत वितळणाऱ्या बर्फामुळें पूर येतो व ह्या पुरामुळ तिच्या उजव्या तीराला धक्का बसून तो वाहून जातो. ही आपत्ति टाळण्यासाठी व धर्मशाळांचें व गांवाचें संरक्षण करण्यासाठी भिंत बांधण्याचें काम गेल्या वर्षी ऑक्टोबर मध्यें हातीं घेण्यांत आलें. कामावरील मजुरांना गुडघाभर, बर्फा-प्रमाणें थंड, पाण्यांत उभें राहून काम करावें लागे व दररोज दोन तासांपेक्षा ज्यास्त वेळ काम होत नसे. नोव्हेंबरअखेर बद्रिनाथा-जवळ इतकी थंडी पडते, कीं तेथें माणूस रहाणें अशक्य होतें. १५ मे रोजीं बांधकामास पुनः प्रारंभ करण्यांत आला. जून, १९५६ अखेर काम पुरें होईल.

## कांहीं प्रमुख उद्योगधंद्यांचें उत्पादन

| उद्योगधंदा | पहिले तीन महिने | | अ चे ब शीं % प्रमाण |
|---|---|---|---|
| | १९५५ अ | १९५४ ब | |
| कपास कापड ( दशलक्ष वार ) | १२६८ | १२२० | + ३·९ |
| कपास सूत ( दशलक्ष पौंड ) | ३७९ | ३९५ | + ४·२ |
| लोकरीचा माल ( लक्ष पौंड ) | ४०·७ | २७·७ | + ४६·९ |
| तागाचा माल ( हजार टन ) | २५४·६ | २११·२ | + २०·५ |
| पोलाद ( हजार टन ) | २९५·७ | २८०·४ | + ५·५ |
| सिमेंट ( हजार टन ) | ११२१ | ११०४ | + १·५ |
| कोळसा ( लक्ष टन ) | ९७·१ | ९०·३ | + ७·५ |

# अर्थ

बुधवार, ता. ३ ऑगस्ट, १९५५





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## स्टेट बँकेच्या स्थापनेची पूर्वपीठिका

### राष्ट्रीयीकरणापासून होणारे फायदे : श्री. रामराव ह्यांचा आढावा

इंपीरिअल बँकेचें राष्ट्रीयीकरण ही देशांतील सर्व व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची पहिली पायरी आहे, अशी समजूत प्रसृत झालेली आहे, ती दूर करण्याचा प्रयत्न रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, श्री. बी. रामराव, ह्यांनीं एका भाषणांत नुकताच केला. ते म्हणाले, कीं देशाच्या विकासास ( १ ) स्वस्त कर्जपुरवठा ( २ ) स्वस्त प्रेरक शक्ति ( ३ ) वहातुकीचीं साधनें ह्यांची अत्यंत आवश्यकता असते. कर्जपुरवठ्याच्या सोईच्या अभावीं, मोठ्या प्रमाणावर औद्योगिक प्रगति होणें अशक्य आहे. आज सबंध भारतांत मिळून शेडयूल्ड बँकांच्या २,८०० कचेऱ्या आहेत आणि जिल्ह्यांचीं १०० ठिकाणें अशीं आहेत, कीं जेथें इंपीरिअल बँकेची किंवा एखाद्या मोठ्या शेडयूल्ड बँकेची एकहि शाखा नाहीं. ग्रेटब्रिटनसारख्या उद्योगप्रधान देशांशीं भारताची तुलना करणें अर्थातच योग्य होणार नाहीं. पण, तेथील एका बँकेच्या शाखांची संख्याच मुळीं भारतांतील बहुतेक सर्व शेडयूल्ड बँकांच्या सर्व कचेऱ्यांच्या संख्येइतकी येईल !

#### बँकिंगच्या प्रसारास जनतेच्या विश्वासाची आवश्यकता

कर्जपुरवठ्याचा प्रश्न बाजूस ठेवला, तरी अर्ध–शहरी व ग्रामीण भागांत स्थिर पायावरील व सुव्यवस्थित बँकांचा प्रसार होणें त्या विभागांतील बचतीचा ओघ बँकांकडे वळविण्याच्या दृष्टीनें आवश्यकच आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील खर्चाची कांहीं तरतूद तुटीच्या अर्थव्यवस्थेनें व इतर मार्गांनीं होऊं शकली, तरीं अखेर जनतेच्या बचतीमधून पैसा उभारला गेला पाहिजे, हें उघड आहे. त्याकरितां सुसज्ज अशा बँकिंगच्या संघटनेची जरूरी आहे.

बँकिंगच्या प्रसाराचा प्रश्न रिझर्व्ह बँकेनें हातीं घेतला, परंतु असा प्रसार घडवून आणण्यापूर्वी बँकिंगवरील जनतेचा विश्वास स्थिर होणें अगत्याचें होतें. गेल्या दहा वर्षांत अनेक उपऱ्या बँका स्थापन झालेल्या होत्या व शेकडों बँका लिक्विडेशनमध्यें गेल्या होत्या. बँकिंगवरील लोकांच्या विश्वासास हादरा बसलेला होता, तेव्हां हा विश्वास पुनः निर्माण करणें जरूर होतें. म्हणून, बँकांच्या वारंवार तपासणीची पद्धति सुरू करण्यांत आली. ह्या तपासणीचा परिणाम अत्यंत अनुकूल असा झालेला आहे. कित्येक सहकारी बँकांनीं आपण होऊन रिझर्व्ह बँकेच्या ह्या तपासणीचा आग्रह धरला आहे.

#### इंपीरिअल बँकेची शाखा–वाढ

डॉ. मथाई हे अर्थमंत्री होते, त्यावेळीं श्री. रामराव ह्यांनीं त्यांना इंपीरिअल बँकेच्या आणखी कचेऱ्या अर्ध शहरी व ग्रामीण भागांत उघडण्याबाबत एक योजना सादर केली. सरकारची पैशाचीं कामें करणाऱ्या सुमारें १,५०० ट्रेझऱ्या व सबट्रेझऱ्या आहेत. त्या अर्थातच कर्जें देत नाहींत; परंतु ज्या ठिकाणीं इंपीरिअल बँकेच्या शाखा आहेत, तेथें ती बँकच सरकारी पैशाचीं कामें करते व व्यापारी बँकिंगच्या पद्धतीचीं कर्जे देते. श्री. रामराव ह्यांची योजना अशी होती, कीं इंपीरिअल बँकेनें शक्य तितक्या त्वरेनें सर्व ट्रेझऱ्या व सबट्रेझऱ्या ह्यांचीं कामें आपल्याकडे घ्यावीं व त्यांचे ठिकाणीं पतीचे व्यवहार सुरू करावे. तालुक्यांच्या गांवापुरती ही व्यवस्था होईल; अंतर्गत भागांत पुनर्घटित व कार्यक्षम अशा सहकारी संघटनेनें शेतकऱ्यांच्या गरजा भागवाव्या.

डॉ. मथाई ह्यांनीं सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास ह्यांच्या अध्यक्षतेखालीं ग्रामीण कर्जपुरवठ्याच्या व्यापक प्रश्नाच्या अनुरोधानें ह्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं एक कमिटी नेमली. १९५० सालीं कमिटीचा अहवाल प्रसिद्ध झाला, त्यांत श्री. रामराव ह्यांच्या योजनेस पाठिंबा मिळाला. सुरवात म्हणून, पांच वर्षांत २७५ नव्या शाखा उघडण्यास इंपीरिअल बँकेस उद्युक्त करण्यांत यावें, असें कमिटीनें सुचविलें. रिझर्व्ह बँकेनें इंपीरिअल बँकेवर मनमिळाऊ दडपण आणलें, तरी फक्त ८० च शाखा ती उघडूं शकली. इंपीरिअल बँकेनें थोड्या अवधींत मोठी शाखावाढ करण्याच्या मार्गांत खरोखरीच्या अडचणी होत्या. कित्येक वर्षेंपर्यंत नव्या शाखांनीं फायदा दाखविणें शक्य नसतें. इंपीरिअल बँकेच्या भागदारांनीं ( त्यांतील बहुसंख्य भागदार मध्यमवर्गीय आहेत. ) देशाच्या हितासाठीं का होईना, आपलें डिव्हिडंड व उत्पन्न कमी होण्यास तयार होणें संभवनीय नव्हतें. इतर बँकांच्या शाखावाढीच्या बाबतींतहि हीच अडचण आहे आणि ट्रायब्यूनलच्या निवाड्यांनीं नोकरांच्या पगारांत वाढ केल्यानें, व्यवस्थाखर्च वाढल्यामुळें अडचणींत भरच पडली. उद्योग व शेती ह्यांच्या विकासासाठीं आवश्यक ती पतव्यवस्था खासगी उपक्रमांचे हातून होणें अशक्य असल्याचें दिसून आलें.

#### बेकारीच्या प्रश्नाची निकड

इकडे, बेकारीचा प्रश्न बिकट होऊं लागला होता. यांत्रिकीकरण झालेल्या मोठ्या कारखान्यांच्या स्थापनेनें किंवा गृहोद्योगानें हा प्रश्न सुटण्यासारखा नाहीं. देशभर मध्यम आकाराच्या व लहान आकाराच्या उद्योगधंद्यांचें जाळें पसरलें म्हणजे त्यांत मोठ्या कारखान्यांच्या उत्पादनास वाव मिळतो आणि गिऱ्हाइकांची जी गरज गृहोद्योग भागवूं शकत नाहींत, ती भागूं शकेल. व्यापारी बँकेच्या शाखांच्या जाळ्यामार्फत कर्जपुरवठ्याची व्यवस्था झाल्याखेरीज असे उद्योगधंदे सुरू होणेंहि अशक्य आहे. म्हणून बँकिंगच्या सोईचा प्रसार करण्याच्या प्रश्नास तांतडीचें महत्त्व प्राप्त झालें. सरकारनें ह्याबाबत जबाबदारी पत्करली नाहीं, तर योजनाबद्ध विकास घडून येणार नाहीं, हें स्पष्ट दिसून आलें. शेतीला पाणीपुरवठा, वजिपुरवठा, वहातुकीच्या सोई, इत्यादि बाबतींत सरकारनें व्यवस्था केलेलीच आहे; बँकिंगच्या बाबतींत सरकारनें पुढाकार घेण्यास तर विशेष कारणें आहेत. सुरवातीला नव्या शाखा तोट्यांत चालतील हें उघड आहे. पण कालांतरानें

त्या त्या विभागांतील उद्योगधंद्यांस बँकिंगच्या सोईमुळें गति मिळून, शाखा नफ्यांत चालू लागतील. रिझर्व्ह बँकेकरवीं सरकार इंपीरिअल बँकेचे भाग धारण करीत आहे, त्यामार्फत मिळणाऱ्या डिव्हिडंड द्वारा मुख्यतः सरकारला फार उत्पन्न मिळणार नाहीं; पण लोकांच्या समृद्धीच्या स्वरूपांत तें दिसून येईल. इनकमटॅक्स, एक्साइज, इत्यादींचें उत्पन्नहि वाढत्या उत्पादना-बरोबर सुधारेल.

इंपीरिअल बँकेचें स्टेट बँकेंत रूपांतर करण्याची शिफारस रूरल क्रेडिट सर्व्हे कमिटीनें केली. "बलिष्ठ, सुसूत्र, सरकार-पुरस्कृत व्यापारी बँकेची स्थापना व्हावी; तिच्या शाखांचें जाळें देशभर असावें; तें आणखी पसरलें म्हणजे बिगर-बँकिंग ट्रेझऱ्यांचें रोखीचें काम त्या बँकेकडे यावें, सहकारी व इतर बँकांची पैशाच्या वर्गावर्गीची सोय वाढावी, अशा बँकांच्या आणखी स्थापनेस चालना मिळावी" हा प्रस्तुत शिफारसीचा उद्देश होता. सरकारनें गेल्या डिसेंबरांत स्वतःचें धोरण जाहीर केलें. रूरल क्रेडिट सर्व्हेच्या अहवालानेंच केवळ सरकारचें धोरण ठरलें गेलेलें नाहीं; केवळ ध्येयवादाचा तो परिणाम आहे असेंहि नाहीं. कित्येक वर्षें ह्या प्रश्नाचा विचार चालू होता, आणि जुन्या इंपीरिअल बँकेचा विस्तार करण्याचे प्रयत्नहि चालू होतेच.

### भीतीचें निराकरण

इंपीरिअल बँकेंतून स्टेट बँक निर्माण करण्यांत आली, ह्याचा सरळ अर्थ इतर बँकांचेंहि लवकरच राष्ट्रीयीकरण होणार, ह्या भितीस आधार नाहीं. अर्थमंत्र्यांनीं पार्लमेंटांत स्पष्ट-पणें जाहीर केलेलें आहे, कीं कांहीं सरकार-संबंधित बँका वगळल्या तर इतर कोणत्याहि इतर व्यापारी बँकांचें राष्ट्रीयीकरण करण्याचा सरकारचा विचार नाहीं. स्टेट बँकचा कारभार कडक नोकरशाही पद्धतीनें चालल्यामुळें इंपीरिअल बँकेकडून मिळत असलेली सेवा किंवा सोई हीं स्टेट बँक देऊं शकेल किंवा नाहीं ह्याची कित्येकांना शंका वाटते. सरकारच्या वृथा हस्तक्षेपास राजकीय हेतुहि कारणीभूत होणें शक्य आहे, अशीहि भीति व्यक्त केली जाते. सरकारनें असंदिग्ध शब्दांत दिलेलीं आश्वासनें बाजूला ठेवलीं, तरी कायद्यांतील बंधनेंहि कांहीं कमी नाहींत. ह्या बंधनांनुसार बोर्डाला व्यापारी तत्त्वानेंच बँक चालवावी लागेल. बँकर्समध्यें रूढ असलेल्या पद्धती चालू ठेवण्याची स्टेट बँकेवर जबाबदारी आहे आणि गुप्तता राखण्याचेंहि बंधन आहे. राजकीय व कारभारविषयक हस्तक्षेप अवघडच नव्हे तर अशक्यप्राय करणारीं कलमें कायद्यांत घातलेलीं आहेत. मध्यवर्ती किंवा राज्य विधिमंडळाचा सभासद बोर्डाचा डायरेक्टर होऊं शकणार नाहीं. सार्वजनिक हितास योग्य अशा सूचना सरकार करील, त्या रिझर्व्ह बँकेमार्फतच; रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्न-राच्या व स्टेट बँकेच्या चेअरमनच्या सल्लयानेंच. कायद्यांतील तरतुदी प्रत्यक्ष व्यवहारांत उतरतीलच असें नाहीं; डायरेक्टर बोर्डाच्या सभासदांच्या उच्च पातळीवरच बरेचसें अवलंबून रहाणार. स्टेट बँकेच्या बोर्डाच्या सभासदांची छाननी केली, तर देशांतील कोणत्याहि कंपनीच्या बोर्डापेक्षा तें बोर्ड लायकी, पात्रता व चारित्र्य ह्या बाबतींत सरस ठरेल; डॉ. मथाई हे त्याचे चेअरमन व श्री. वैकुंठराय मेहता हे व्हाइस चेअरमन आहेत.

### अनुभव काय सांगतो ?

१९४९ मध्यें रिझर्व्ह बँक सरकारी मालकीची करण्यांत आली, त्यावेळीं अशाच प्रकारची भीति व संशय हीं व्यक्त करण्यांत आलीं होतीं. रिझर्व्ह बँकेचें त्यावेळचें बोर्डहि राष्ट्रीयी-करणाच्या विरुद्ध होतें. मध्यवर्ती सरकार गव्हर्नरच्या सल्लयानें रिझर्व्ह बँकेस सूचना करूं शकतें; पण गेल्या सहा वर्षांत सर-कारच्या अशा हस्तक्षेपाची एकदाहि पाळी आलेली नाहीं. १९३९ नंतर रिझर्व्ह बँकेच्या कामांत बऱ्याच घडामोडी झाल्या आहेत. सर्व व्यापारी बँकांच्या तपासणीची पद्धत चालू ठेवणें कितीतरी खर्चाचें आहे, पण बँकिंगच्या स्थैर्याच्या दृष्टीनें अशी तपासणी आवश्यक आहे. नोव्हेंबर, १९५१ मध्यें रिझर्व्ह बँकेनें नाणें विषयक धोरणांत बदल केला. बँकेच्या बिलमार्केट योजनेप्रमाणें गेल्या वर्षी बँकांना १६० कोटी रुपयांचीं कर्जें देण्यांत आलीं. ही योजना बँका व व्यापारी ह्यांना उपकारक ठरली आहे. बँकेचें ग्रामीण पतविषयक धोरण तर जवळ जवळ क्रांतिकारकच ठरेल. ह्या सर्व बाबतींत रिझर्व्ह बँकेनेंच पुढाकार घेतला; सरकारनें त्यांत ढवळा-ढवळ केली नाहीं. अर्थात्, ह्या सर्व प्रश्नांची अर्थखात्याशीं चर्चा करण्यांत येऊन त्याची संमति मिळविण्यांत आलेली होती.

### लोकशाही पद्धतीवर विश्वास

जनतेच्या रहाणीचा दर्जा उंचावण्याचा महान् प्रयत्न करण्यांत येत आहे. हा प्रयत्न यशस्वी व्हावयाचा असेल, तर लोकसंख्येच्या वाढीच्या वेगापेक्षा अधिक वेगानें शेतीचें व औद्योगिक उत्पादन वाढलें पाहिजे. हा केवळ आर्थिक प्रश्न नसून, त्यास राजकीयहि बाजू आहे. लोकशाही पद्धतीचें महत्त्व आपण सर्व जण जाणतों; पण हुकूमशाही पद्धतीखालील होणाऱ्या प्रगतीपेक्षा अधिक जोमाची प्रगति आपण लोकशाही-तहि करूं शकतो, हें आपण दाखवून दिल्याखेरीज लोकशाहीचा टिकाव लागणार नाहीं. म्हणून, कालहानि चालणार नाहीं. योग्य काळांत आपण रहाणीचा दर्जा पुरेसा वाढवूं शकलों नाहीं, तर भुकेली प्रजा दुसऱ्या टोकाच्या, समृद्धीचीं निदान आशा दाखविणाऱ्या, आर्थिक पद्धतीकडे आकर्षिली जाण्याची भीति आहे. ह्यासाठीं, शेतीच्या व औद्योगिक विकासाचे मार्गां-तील अडथळे शक्य तेवढ्या त्वरेनें दूर होणें आवश्यक आहे. भारताच्या फार मोठ्या प्रदेशांतून बँकिंगच्या सोईचा अभाव, हा त्यांतील महत्त्वाचा अडथळा आहे आणि तो दूर करण्यासाठी स्टेट बँकेचा जन्म आहे.

---

**ब्रिटिश शाळकरी मुलांची भारताला भेट**—येत्या १५ ऑगस्टचा स्वातंत्र्यदिनाचा समारंभ पहाण्यासाठी ब्रिटनमधील १०० शाळकरी मुलें दिल्लीला येत आहेत. ह्या मुलांचे आईबाप पौर्वात्य देशांत रहात आहेत. ३० मुलें नुकतींच दिल्लीला आलीं. बाकीचीं लवकरच येणार आहेत.

**पोलंडमधील औद्योगिक प्रदर्शन**— पोलंडच्या राजांची जुनी राजधानी पोझनन येथें नुकतेंच एक औद्योगिक प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. प्रदर्शनांत ब्रिटन, फ्रान्स, पश्चिम जर्मनी, चीन, इत्यादि राष्ट्रांनीं भाग घेतला होता. पोलंडमधील औद्योगिक पुनर्घटनेची कल्पना प्रदर्शनावरून येत होती. निर्यात व्यापारांत पोलंड आतां भाग घेईल, असें दिसतें.


**पुण्याचें स्वागत लॉज**

पुण्याच्या "स्वागत लॉज"चे पाहुणे, म्हणजे चांगल्या गोष्टींचे पुरस्कर्ते असल्याची १०० टक्के खात्री !

स्वागत लॉजिंग-बोर्डिंग, डेक्कन जिमखाना, फोन ४०६०

## नवें बँक अवार्ड ह्या महिन्यांत प्रसिद्ध होणार

### अहवाल तयार झाला

न्या. गजेंद्रगडकर, बँक अवार्ड कमिशनचे एकमेव समासद, ह्यांनीं आपल्या रिपोर्टावर सोमवार, दि. २५ जुलै रोजीं मुंबई येथें सही केली. रिपोर्टाचीं ५५० पृष्ठें असून, त्याचे दोन भाग आहेत. पहिला भाग प्रसिद्ध करण्यांत येईल व दुसरा भाग सरकारच्या माहितीकरितांच केवळ असल्यानें तो इतरांना उपलब्ध होणार नाहीं. ह्या भागांत वैयक्तिक बँकांतील परिस्थितीच्या पहाणीचा निष्कर्ष देण्यांत आलेला आहे.

लेबर अपेलेट ट्रायब्यूनलचा निवाडा जसाच्या तसा किंवा कांहीं दुरुस्त्यांसह अंमलांत आणावा, का २४ ऑगस्ट, १९५४ चा सरकारी निर्णय कायम करावा, ह्यासंबंधीं रिपोर्ट करण्यासाठी १७ सप्टेंबर १९५४ रोजीं कै. न्या. राजाध्यक्ष ह्यांच्या कमिशनची सरकारनें नेमणूक केली. त्यांच्या मृत्यूनंतर न्या. गजेंद्रगडकर ह्यांची ७ मार्च, १९५५ रोजीं त्यांचे जागीं नेमणूक करण्यांत आली. गजेंद्रगडकर कमिशननें, पूर्वी कोणत्याहि ट्रायब्यूनलनें किंवा कमिशननें जमा केली नव्हती अशी ताजी माहिती जमा केली.

कमिशननें प्रश्नपत्रिका तयार केली, ती २१ ऑक्टोबर, १९५४ रोजीं १०५ बँकांकडे पाठविण्यांत आली. त्यांपैकीं फक्त ६७ बँकांनीं तपशीलवार माहिती पुरविली. उत्तरें धाडण्याची मुदत वाढविण्यांत आल्यानंतर, उत्तरें तपासून पहातां त्यांतील पुष्कळ उत्तरें अपुरीं व दोषास्पद आढळलीं. त्यामुळें, कमिशनला प्रत्येक बँकेशीं पत्रव्यवहार करून माहिती मिळवावी लागली. परंतु तीहि व्यवस्था समाधानकारक झाली नाहीं आणि शेवटीं बँकांच्या प्रतिनिधींना कमिशनच्या कचेरींत बोलावून किंवा कमिशनचे अधिकारी बँकांकडे पाठवून बँकांच्या हिशेबांचे खुलासे मिळवावे लागले. कमिशनच्या कामास गति मिळते न मिळते, तोंच न्या. राजाध्यक्ष हे एकाएकीं आजारी पडून मृत्यु पावले. त्यांचे जागीं न्या. गजेंद्रगडकर ह्यांची नेमणूक झाली.

मार्च, १९५५ अखेर बँकांविषयीं बहुतेक सर्व तपशील जमा झाला. त्याची छाननी करण्यासाठी रिझर्व्ह बँकेच्या 'पॉवर-सॅमस' यंत्रांचा उपयोग करण्यांत आला. ह्या छाननीच्या आधारें, कमिशनच्या अध्यक्षांच्या सल्ल्यानुसार, कमिशनच्या अधिकाऱ्यांनीं प्रत्येक बँकेविषयीं व बँकांच्या गटांविषयीं टिपणें तयार केलीं. बँका व त्यांचे नोकर ह्यांच्या प्रतिनिधींशीं त्याबाबत चर्चा केल्यानंतर सर्वांगीण विचार करून, वेगवेगळ्या अवार्डांप्रमाणें पगार देण्याचा प्रत्येक बँकेच्या शक्याशक्यतेविषयीं निर्णय नमूद करण्यांत आला. वैयक्तिक बँकांच्याविषयीं असा निर्णय घेण्यास एक महिना लागला. त्यानंतर रिपोर्ट तयार करून तो सायक्लोस्टाइल करण्यास पांच महिने लागले.

रिपोर्टाचीं एकंदर ११ प्रकरणें आहेत. सायक्लोस्टाइल केलेलीं ३०० पृष्ठें व ५० परिशिष्टें, ह्यांचा रिपोर्ट बनलेला आहे. कमिशनच्या कामाच्या व्यापाची कल्पना खालील आकड्यांवरून येईल. प्रश्नपत्रिका २४ छापील पृष्ठांची होती. जमा केलेल्या माहितीचीं ३०० छापील पृष्ठें झालीं. प्रत्येक बँकेबाबत ३,६०० वेगवेगळे आकडे होते. कमिशननें २,५०० पत्रें धाडलीं. चेअरमननें ९७ सभा घेतल्या. कमिशनचे अधिकारी व नोकर ह्यांना विश्रांति न घेतां रात्रंदिवस काम करावें लागलें.

दुरुस्त बँक अवार्डची मुदत २४ ऑगस्ट रोजीं संपत आहे. त्यापूर्वी कमिशनच्या शिफारसी सरकारला सादर केल्या जाऊन प्रसिद्धीस दिल्या जातील.

### भारताच्या चहासाठीं नव्या बाजारपेठा

ऑस्ट्रेलिआ आणि न्यूझीलंड ह्या देशांत भारताच्या चहाचा खप होणें कितपत शक्य आहे तें अजमावून पहाण्यासाठी भारताचें अधिकृत शिष्टमंडळ येत्या ऑक्टोबरमध्यें त्या देशांना भेट देणार आहे. प्रतिनिधी मंडळांत तीन सभासद असतील आणि त्याचे अध्यक्ष म्हणून टी बोर्डाचे अध्यक्ष श्री. घोसल हे काम पहातील. ऑस्ट्रेलिआंत व न्यूझीलंडमध्यें सध्यां जितका चहा खपतो त्यापैकी ९० टक्के चहा सिलोनकडून पुरविला जातो. ऑस्ट्रेलिआंतील दरमाणशी चहाचा खप जगांत दुसऱ्या अनुक्रमाचा आहे. अमेरिका आणि कॅनडा ह्या देशांचाहि दौरा प्रतिनिधी मंडळ करणार आहे. चहाचा प्रसार करून तो लोकप्रिय करण्यासाठी डब्लिन, आमस्टरडॅम, हॅम्बुर्ग, अमेरिका व कॅनडा ह्या देशांतून टी कौन्सिलें स्थापन करण्यांत आलेलीं आहेत. भारत ह्या टी कौन्सिलचे सभासद आहे. ऑस्ट्रेलिआ व न्यूझीलंड ह्या देशांतून मात्र अशा संस्था नाहींत. भारतीय प्रतिनिधी मंडळ वरील दोन देशांत संस्था स्थापन करण्याचा प्रयत्न करण्याचा संभव आहे. प्रतिनिधी मंडळ अमेरिकेला जाण्यापूर्वी श्री. घोसल हे डब्लिन, आमस्टरडॅम व हॅम्बुर्ग ह्या शहरांना भेट देऊन येणार आहेत. चहाच्या परदेशांतील खपासंबंधीं बोलतांना श्री. घोसल म्हणाले कीं, अमेरिकेंत चहाचा खप वाढत आहे. कॅनडांत मात्र तो फारसा जोरानें वाढत नाहीं, असें दिसतें. तथापि, तेथील टी कौन्सिलें चहाचा प्रसार करण्याचें कार्य चांगल्या प्रकारें करीत आहेत. त्यामुळें दोन्ही देशांतील चहाचा खप सुधारेल अशी अपेक्षा करण्यास जागा आहे.

### नित्योपयोगी वस्तूंच्या उत्पादनाबद्दल इषारा

फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज ह्या संस्थेचे अध्यक्ष श्री. शांतिलाल मंगळदास ह्यांचें दिल्ली येथील रोटरी क्लबांत दुसऱ्या पंचवार्षिक योजनेवर भाषण झालें. ह्या विषयासंबंधीं बोलतांना ते म्हणाले कीं, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ग्रामोद्योग आणि भारी उद्योगधंदे ह्यांच्या विकासावर विशेष भर देण्यांत आलेला आहे. परंतु, ह्या धोरणामुळें देशांत चलनविस्तार होण्याची शक्यता आहे. ह्यामुळें देशाची औद्योगिक प्रगति अडखळल्यासारखी होईल. आर्थिक प्रगति साध्य करण्यासाठी नित्योपयोगी वस्तूंच्या उत्पादनावर मर्यादा घालण्याचा सरकारचा विचार दिसत आहे. सरकारनें अशी मर्यादा घालूं नये, अशी माझी विनंति आहे. मोठ्या प्रमाणावर चाललेल्या उद्योगधंद्यांवर अशा प्रकारचें बंधन घालून नित्योपयोगी वस्तूंची देशांतील वाढती मागणी ग्रामोद्योगांकडून पुरविण्याची सरकारची योजना चुकीची आहे. कारण, ग्रामोद्योगांकडून योग्य त्या प्रकारचा माल योग्य वेळीं आणि लोकांना विकत घेण्यास परवडेल अशा किंमतींना पुरविला जाणार नाहीं; त्यांना तें शक्य होणार नाहीं. ह्याबाबत माझी अशी सूचना आहे कीं, ग्रामोद्योग व मोठे उद्योगधंदे ह्या दोघांनाहि विस्तार करण्याची मुभा असावी. त्यामुळें मागणी असणाऱ्या मालाचें उत्पादन होऊन लोकांचें राहणीचें मान वाढेल. देशाच्या औद्योगिक जीवनांत सार्वजनिक मालकीचा विभाग कर्ज काढून वाढविण्याचा सरकारचा विचार असेल, तर तो योग्य नाही. कारण, हें धोरण खाजगी उद्योगधंद्यांच्या विकासाला अडचणीचें ठरेल.

## भारतांतील शेतमजुरांची सामाजिक व आर्थिक परिस्थिति

### त्यांचें एकूण कर्ज ८४ कोटी रु.

भारतांतील दर शेतमजूर कुटुंबाचें वार्षिक सरासरी उत्पन्न सुमारें ४४७ रु. आहे. यापैकी ६४·२ टक्के उत्पन्न शेतमजुरीपासून, ११·९ टक्के इतर प्रकारच्या मजुरीपासून, १३·४ जमिनीच्या लागवडीपासून व १०·५ टक्के इतर मार्गांनीं झाल्याचें भारत सरकारनें १९५०–५१ मध्यें केलेल्या अखिल भारतीय चौकशी-वरून दिसून येतें.

सर्वांत अधिक सरासरी उत्पन्न वायव्य भारतांत ( ६५१ रु. ) व सर्वांत कमी दक्षिण भारतांत ( ३८२ रु. ) होतें. प्रदेशनिहाय हे आंकडे उत्तर भारत ५५१ रु., पूर्व भारत ५०६ रु., पश्चिम भारत ३९१ रु. व मध्य भारत ४१७ रु. असे होते.

देशांतील शेतमजूर कुटुंबांची एकूण मजुरी ५०० कोट रु. झाली. तर मळे वगळतां शेतकीपासून एकूण ४८०० कोटी रु. राष्ट्रीय उत्पन्न झालें. म्हणजे शेतमजुरींचें प्रमाण शेतकीपासून होणाऱ्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या १०·५ टक्के झालें.

ही पाहणी 'सर्वसाधारण गांवाची पाहणी' सर्वसाधारण कुटुंबाची पाहणी' व 'कुटुंबाची सर्व बाजूंनीं पाहणी' अशा तीन टप्प्यांतून करण्यांत आली. अशा प्रकारची पाहणी अखिल आशियांत पहिल्या प्रथमच करण्यांत आली असून तिच स्वरूपहि सर्वांत मोठें होतें. पहिल्या दोन टप्प्यांतील अहवाल यापूर्वीच प्रसिद्ध झाले आहेत.

या अहवालांत तिसऱ्या व अखेरच्या टप्प्याची माहिती आहे. ही चौकशी ११,००० शेतमजूर कुटुंबांच्या पाहणीवर आधारलेली आहे. या अहवालांत नोकरी, बेकारी, मजुरी, राहणीचा खर्च व राहणीमानाचा दर्जा, शेतमजुरांच्या कर्जाची परिस्थिति, इत्यादि विषयीं माहिती आहे. या कालावधींत दर महिन्यास कांहीं निवडक कुटुंबांच्या मुलाखती घेऊन ही माहिती मिळविली होती. या चौकशीचें काम नमुने पाहण्याच्या शास्त्रोक्त पद्धतीनें व तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली झालें आहे.

या चौकशीवरून शेतमजुरांचें दरडोई उत्पन्न १०४ रु. असल्याचें आढळून आलें. दरडोई राष्ट्रीय उत्पन्न २६४ रु. आहे. यावरून भारतीय संघराज्यांतील एकूण कुटुंबांपैकी २२·७ टक्के कुटुंबांचें प्रतिनिधित्व करणाऱ्या शेतमजुर कुटुंबाचें उत्पन्न केवळ ८·३ टक्के असल्याचें दिसून आलें.

मद्रास, त्रावणकोर–कोचीन, मुंबई, मध्यप्रदेश, मध्य भारत व ओरिसा या राज्यांतील बहुसंख्य कुटुंबाचें उत्पन्न १०० ते ४०० रु. च्या दरम्यान, उत्तर प्रदेश, प. बंगाल, बिहार, आसाम, सौराष्ट्र, राजस्थान, पंजाब राज्यांतील अशा कुटुंबांचें उत्पन्न ३०० ते ७०० रु. च्या दरम्यान असल्याचें आढळून आलें. पेप्सु राज्यांतील ४० टक्के शेतमजूर कुटुंबांचें उत्पन्न ९०१ रु. व त्यावरील गटांत होतें.

### खर्चाचें प्रमाण

शेतमजूर कुटुंबाच्या खर्चाचें प्रमाण सर्वांत जास्त वायव्य भारतांत ( रु. ६७४ ) व सर्वांत कमी पश्चिम भारतांत ( रु. ३९२ ) होतें. मध्यभारत, उत्तर भारत, पूर्व भारत व दक्षिण भारत या विभागांचे हेच आंकडे अनुक्रमें ४२८, ५४८, ५२८ व ३९७ रु. असे होते. प्रत्येक विभागांतील निरनिराळ्या राज्यांतील शेतमजूर कुटुंबांच्या खर्चांतहि डोळ्यांत भरण्यासारखा फरक आढळून आला. शेतमजूर कुटुंबास येणाऱ्या एकूण ४६८ रु. खर्चापैकी केवळ अन्नासाठी ८५ टक्के खर्च झाला. बहुतेक सर्व कुटुंबांचें अंदाजपत्रक तुटीचेंच होतें. प्रत्येक कुटुंबास सरासरी १४ रु. तूट आली.

कपडालत्ता व पादत्राणें यांवर २९ रु., म्हणजे ९·३ टक्के खर्च झाला. हें प्रमाण उत्तर व वायव्य भारतांत अधिक म्हणजे अनुक्रमें ५२ व ४३ रु. होतें.

इतर खर्चाचें प्रमाण रु. ३० अथवा एकूण खर्चाच्या ६·५ टक्के होतें. यांत तंबाकू, विडी, सुपारी, सिगरेट, धुण्याचा साबण व औषधपाणी यांवरील खर्चाचा समावेश होतो. या गटावर सर्वांत अधिक खर्च दक्षिण भारतांत झाला.

घरभाडें व दुरुस्त्या, जळण व प्रकाश इत्यादींवर जवळजवळ मुळींच खर्च झाला नाहीं.

### रोजगार मिळण्याचा काळ

ग्रामीण भारतांत शेतकी मजुरांपैकी ५५ टक्के पुरुष मजूर होते. सरासरीनें दर प्रौढ मजुरास वर्षांतून १८९ दिवस शेतीचें आणि २९ दिवस इतर प्रकारचें काम मिळतें असें आढळून आलें. उत्तर भारतांत सर्वांत जास्त म्हणजे २८९ दिवस रोजगार मिळे. मध्य व पूर्व भारतांत हा आंकडा अनुक्रमें २४५ व २४४ आढळून आला. पश्चिम भारतांत मजुराला १९६ दिवस काम मिळतें, तर दक्षिण भारतांत सर्वांत कमी दिवस म्हणजे १८१ दिवसच काम मिळतें, असें आढळून आलें. स्त्री कामगारांना वर्षांतून १२० दिवस शेतकीचें आणि १४ दिवस इतर प्रकारचें काम मिळतें असें पाहणींत आढळून आलें. सामान्यतः तण काढणें, लावणी करणें किंवा कापणीचें यासारखें कामच त्यांना मिळतें.

पुरुष मजुरांप्रमाणेंच स्त्रियांनाहि उत्तर भारतांत सर्वांत जास्त म्हणजे १४३ दिवस काम मिळतें. त्यानंतर मध्य भारतांत १४१ दिवस, दक्षिण भारतांत १३९ दिवस, पश्चिम भारतांत ११६ दिवस, ईशान्य भारतांत ११५ दिवस व पूर्व भारतांत १२३ दिवस, असा क्रम लागतो.

### बेकारीचा काळ

सरासरीनें प्रौढ मजुरास वर्षांतून सुमारें ८२ दिवस पगार मिळणारें काम मिळत नाहीं. उरलेल्या दिवसांतहि त्यांना कमी रोजगारींत दिवस काढावे लागण्याचा संभव असतो. भारतांतील सुमारें १६ टक्के कामगारांनीं वर्षांतून कोणत्याच महिन्यांत पुरेशा मजुरीची नोकरी नसल्याचें सांगितलें.

तुलनात्मक दृष्ट्या पाहतां दक्षिण भारतांत बेकारीचें प्रमाण अधिक आढळून आलें. तेथें अशी बेकारी सुमारें ११५ दिवस आणि ती सुमारें २० टक्के कामगारांच्या बाबतींत आढळून येतें. पश्चिम भारतांतही बेकारींतील दिवसाचें प्रमाण तितकेंच अधिक म्हणजे ११३ दिवस असून उत्तर भारतांत सर्वांत कमी म्हणजे ४४ दिवस बेकारींत काढण्याची वेळ येते.

नैमित्तिक नोकरींत ठेवल्या जाणाऱ्या प्रौढ मजुरांची सरासरी दैनिक मजुरी, एकंदर देशाचा विचार करतां १७·५ आणे पडते असें आढळून आलें. स्त्रियांची सरासरी दैनिक मजुरी ११ आणे पडते. मजुरांनीं काम केलेल्या दिवसांपैकी सुमारें १३·५ टक्के दिवशीं त्यांना १० आण्यांहून कमी मजुरी पडते. स्त्रियांच्या बाबतींत हें प्रमाण ५६ टक्के पडतें.

औद्योगिक कामगारांशीं तुलना करतां शेतमजुराला त्याच्या

एकतृतीयांश वेतन मिळतें. औद्योगिक कामगारांना पुरुषास दैनिक ५४ आणे व स्त्रियांस १७·५ आणे वेतन पडतें.

### कर्जबाजारीपणा

शेतमजुर कर्जबाजारी असणें देशांत सर्वत्र आढळून आलें. एकूण शेतमजुरांपैकी ४५ टक्के कुटुंबांना कर्ज असून सरासरी कर्ज कुटुंबामागें १०५ रु. होतें. दक्षिण भारतांत हें प्रमाण १०२ रु., पश्चिम भारतांत १०८ रु., मध्य भारतांत १०३ रु. आणि वायव्य भारतांत सर्वांत जास्त म्हणजे ३३३ रु. असल्याचें आढळून आलें.

देशांतील शेतमजुरांचें एकूण कर्ज ८४ कोटी रु. असावें असा अंदाज आहे.

---

### रबराच्या उत्पादनांत वाढ

भारतीय सरकारच्या अन्न व शेतकी खात्याच्या अर्थशास्त्रीय आणि आंकडेशास्त्रीय शाखेनें देशांतील रबराच्या उत्पादनासंबंधींची माहिती प्रसिद्ध केली आहे. पूर्वीच्या 'इंडिअन रबर स्टॅटिस्टिक्स' चें नामकरण हल्ली 'रबर इन इंडिआ' असें करण्यांत आलें असून त्याची २८ वी आवृत्ति प्रकाशित करण्यांत आली आहे. गेल्या कांहीं वर्षांत भारतामधील रबराच्या उत्पादनांत वाढ होत आहे असें दिलेल्या माहितीवरून दिसून येतें. १९५० सालीं नैसर्गिक रबराचें उत्पादन ३·१८ कोटी पौंड झालें होतें. १९५१ सालीं ते ३·२० कोटी पौंड झालें आणि १९५२ सालीं ३·६ कोटी पौंड झालें. रबराच्या उत्पादनांत झालेली वाढ रबराची लागवड असलेल्या जमिनींत वाढ झाल्यामुळें झाली. १९५०, १९५१ व १९५२ ह्या सालांत रबराच्या लागवडीखालील जमीन अनुक्रमं १,०४,४६०; १,०४,५५ व १,११,११७ एकर होती. भारतांत त्रावणकोर–कोचीन राज्यांतच सर्वांत अधिक रबराची पैदास होते. रबराच्या लागवडीखाली असलेल्या एकूण जमिनीपैकीं ८५ टक्के जमीन त्या राज्यांत आहे. त्रावणकोर–कोचीन राज्यानंतर मद्रास, म्हैसूर व कूर्ग ह्यांचे नंबर लागतात. जगांतील रबराच्या उत्पादनाच्या सुमारें २ टक्के एवढेंच रबर भारतांत उत्पादन केलें जातें. १९५२ सालीं भारतांत १·७ कोटी पौंड रबराचा खप झाला. ७० लाख पौंडांपेक्षा अधिक रबर भारताला परदेशांतून आयात करावें लागलें. त्यापैकीं बहुतेक रबर मलाया आणि सीलोन ह्या देशांतुन घेण्यांत आलें.

---

### शेवरोलेट गाडीची आघाडी

१९५५ च्या पहिल्या सहामाहींत अमेरिकेंत जेवढ्या मोटारी विकण्यांत आल्या, त्यांत शेवरोलेट गाडीनें आघाडी मारली. फोर्ड गाडीचा अनुक्रम दुसरा लागला. त्यांचे मागोमाग ब्यूक, प्लायमथ व ओल्डस्मोबाईल ह्या गाड्यांचा अनुक्रम आला.

---

### नफा झाला, तरी वांटतां येणार नाहीं

तीन ब्रिटिश चहा कंपन्या आपल्या वार्षिक सभा शक्य तितक्या लांबणीवर टाकणार आहेत. कारण, कंपन्यांना झालेला नफा पाकिस्तानी हुंडणावळीच्या अडचणीमुळें भागदारांना वांटून देणें त्यांना शक्य होणार नाहीं.

---

### तरुण–तरुणींचें वाढतें मद्यपान

ग्रेटब्रिटनमध्यें, २१ वर्षांखालील मुलांत मद्यपानाचा प्रसार वाढत आहे. २१ वर्षांखालील मुलींतहि स्त्रियांइतकाच मद्यपानाचा प्रसार झाला आहे. इकॉनॉमिक रिसर्च कौन्सिलनें जमा केलेल्या आंकड्यांचा हा निष्कर्ष आहे.

### पाकिस्तानी रुपयाचें अवमूल्यन

पाकिस्ताननें आपल्या रुपयाचें अवमूल्यन करून, त्याची किंमत हिंदी रुपयाच्या बरोबरीवर आणून ठेवली आहे. इंटरनॅशनल मोनेटरी फंडाची त्याला संमति मिळालेली आहे. चलनवाढ व महागाई ह्यांवर उपाय म्हणून हें अवमूल्यन करण्यांत आलेलें आहे. परराष्ट्रीय व्यापारांत तूट येत आहे, त्यालाहि आळा बसावा, अशी कल्पना आहे. नव्या पाकिस्तानी रुपयाची किंमत सोन्याच्या स्वरूपांत ०·१८६६२१ ग्रॅम सोनें व अमेरिकन डॉलर्सच्या स्वरूपांत १ डॉलर = ४·७६१९० रुपये अशी आहे. पाकिस्तानी रुपयाचें ब्रिटिश पौंडाशीं नातें १ रुपया = १ शि. ६ पेन्स असें आतां झालें आहे. सप्टेंबर, १९४९ मध्यें ब्रिटिश पौंड व इतर देशांचीं चलनें ह्यांचें अवमूल्यन झालें, तेव्हां पाकिस्ताननें मात्र आपल्या रुपयाची किंमत उतरविली नाहीं. कारण, पाकिस्तानी ताग व कपास ह्यांना जागतिक बाजारपेठेंत मागणी होती. आतां, ह्या बाजारपेठेंत ताग व कपास ह्यांच्या किंमती खूपच खालीं गेल्या आहेत व त्यांचें उत्पादन करणारे शेतकरी आर्थिक अडचणींत आले आहेत. पाकिस्तानी रुपयाच्या अवमूल्यनामुळें, ह्या मालाच्या उठावास मदत होईल, अशी अपेक्षा आहे. १९४९ मध्यें भारतीय रुपयाचें अवमूल्यन झालें, त्यावेळीं पाकिस्ताननें तें केलें नाहीं त्यांत राजकीय हेतूहि होता; पाकिस्तानच्या त्या निर्णयानें हिंदुस्थानची फाळणी तडीस नेली. भारतापेक्षा आपण श्रेष्ठ आहोंत, असें दाखविण्याचा पाकिस्तानचा तो प्रयत्न होता. आतां मात्र भारतीय व पाकिस्तानी चलनें एकाच पातळीवर आलीं आहेत आणि हिंद–पाकिस्तान व्यापारास त्यामुळें चालना मिळण्याचा संभव आहे.

---

**ग्रामीण विद्यापीठाची स्थापना**—वल्लभ विद्यानगर येथें एका ग्रामीण विद्यापीठाची स्थापना करण्यांत येणार आहे. विद्यापीठ स्थापन करण्यासाठीं जरूर त्या कायद्याचें बिल मुंबई विधिमंडळांच्या चालू अधिवेशनांत प्रविष्ट करण्यांत येईल असें समजतें. विद्यापीठाचें नांव सरदार पटेल विद्यापीठ ठेवण्यांत येणार असून गुजरात कॉलेज, विसनगर कॉलेज आणि सरदार गार्डा कॉलेज त्याला जोडण्यांत येतील.

**यात्रेकरूंवरील कर**—नाशिकला सप्टेंबरच्या २० तारखेला सिंहस्थ यात्रा भरणार आहे. यात्रेसाठीं येणाऱ्या यात्रेकरूंवरील कर पूर्वी चार आणे होता तो आतां दुप्पट म्हणजे ८ आणे करण्यांत आला आहे. यात्रेकरूंवर दरडोई घेण्यांत येणारा हा कर व इतर म्युनिसिपल कर ह्यांच्यामुळें नाशिक म्युनिसिपालिटीला २२ लाख रुपये मिळतील.

**१० जागांसाठीं ७०० अर्ज**—बडोद्याच्या सार्वजनिक बांधकाम खात्यानें एस. एस. सी. पास झालेल्या १० मिस्त्रींच्या जागांसाठीं अर्ज मागविले असतां, त्या जागांसाठीं ७०० अर्ज आले. रस्ता बांधण्याचीं कामें चालूं असतील त्या ठिकाणीं देखरेख करण्याचें काम त्यांनीं करावयाचें आहे.

**वृत्तपत्र–प्रतिनिधींची सोय**—सौराष्ट्रांतील कित्येक शहरांतून जेवणाखाणाची व रहाण्याची नीटशी सोय नाहीं, आणि सरकारी अतिथिगृहांत रहाणें वृत्तपत्रप्रतिनिधींना परवडत नाहीं. त्यामुळें त्यांची फार अडचण होते, अशी तक्रार राज्य सरकारकडे करण्यांत आली होती. ती लक्षांत घेऊन सौराष्ट्र–सरकारनें वृत्तपत्र-प्रतिनिधींना सरकारी अतिथिगृहांत थोड्या आकारांत राहण्याची परवानगी दिली आहे.

## दि बॉम्बे स्टेट
## को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

टेलिफोन नं. ३८,३८१
३८,३८२

पोस्ट बॉक्स नं. ४७२
तारेचा पत्ता : फार्मरबँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | |
|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. ३४,०६,७५० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. २६,००,००० |
| | रु. ६०,०६,७५० |
| गंगाजळी व फंड | रु. ५७,५४,८०० |
| ठेवी | रु. ७,९०,२५,३०० |
| खेळतें भांडवल | रु. १२,७०,२७,००० |

### १६ जिल्ह्यांमध्यें ६७ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.



## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

### मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७६,००० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष.
न. मू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. वृ. खोले.
श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी
श्री. बा. ग. घंडुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दरावाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. २६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
अ. मॅनेजर.



## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

— पुणें शहर —

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८६

भोर, पौड व वडगांव ( मावळ ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतहि सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठी कर्जे देणें, सोनें–चांदीचे तारणावर कर्जें देणें, वगैरें व्यवहार सुरू केले आहेत.

चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.

अेक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीहि स्वीकारल्या जातात.

१ वर्ष २ टक्के, २ वर्षें २॥ टक्के, ५ वर्षें ३ टक्के, ७ वर्षें ३॥ टक्के, १० वर्षें ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

दराबद्दल समक्ष चौकशी करावी.

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याशिवाय पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस् व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रवडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.



## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक ) खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. के. पां. जोशी ( अध्यक्ष )
श्री. ह. व. गिरमे ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४२,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९२,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,००,००० |

### एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.